# मुख्यमंत्र्यांचा मोठा संकल्प: 4 वर्षात ड्रग्ज फ्री होणार मुंबई, नशामुक्ती अभियान लॉन्च

राजेश जायस्वाल ३० जुलै

**मुंबई :** राज्यात व्यसनाधीनतेविरोधात जनजागृती करण्यासाठी राज्य सरकारने राज्यव्यापी नशामुक्ती अभियानाला सुरुवात केली आहे. या महत्त्वाकांक्षी अभियानाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. राज्यभर व्यसनमुक्त समाज घडविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी, विद्यार्थी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थितांना संबोधित करत व्यसनमुक्त समाज निर्माण करणे ही केवळ सरकारची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. युवकांना व्यसनाच्या विळख्यातून दूर ठेवण्यासाठी जनजागृती, समुपदेशन आणि सामाजिक सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.



यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थित नागरिक, विद्यार्थी, अधिकारी आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींसोबत नशामुक्तीची शपथ घेतली. कोणत्याही प्रकारच्या अमली पदार्थांचे सेवन करणार नाही, इतरांनाही त्यापासून दूर राहण्यास प्रोत्साहित करू आणि व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी सक्रिय सहभाग घेऊ, असा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. राज्य सरकारच्या या अभियानांतर्गत शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. व्यसनमुक्तीबाबत जनजागृती, समुपदेशन शिबिरे, प्रबोधनपर उपक्रम आणि विविध सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यावर भर दिला जाणार आहे.

व्यसनमुक्त, निरोगी आणि सुरक्षित महाराष्ट्र घडविण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेले हे अभियान राज्यभर व्यापक स्वरूपात राबविले जाणार असून, समाजातील सर्व घटकांनी त्यात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन मुख्यमंत्री यांनी केले.

# तलाव, टेकड्या, उद्यानाखालून जुळे बोगदे, गोरेगाव-मुलुंड लिंक रोडसाठी 'टीबीएम' तयार

प्रतिनिधी ३० जुलै

**मुंबई:** मुंबईतील महत्त्वाकांक्षी गोरेगाव-मुलुंड लिंक रोड प्रकल्पाच्या सर्वात कठीण बांधकामाच्या टप्प्याला सुरूवात होणार आहे. महापालिका या आठवड्याच्या शेवटी बोगदा खोदकाम सुरू करण्याच्या तयारीत आहे. महापालिकेने मुंबईतील वाहतूककोंडी फोडण्यासाठी महत्वाकांक्षी गोरेगाव मुलुंड लिंक रोडचं काम हाती घेतलं आहे. या प्रकल्पातील कामाचा सर्वात महत्त्वपूर्ण टप्प्याचं काम सुरू होणार आहे. मुंबईतील रस्त्यांखाली जुळे बोगदे बांधण्यात येणार आहेत. या बोगद्यांचं खोदकाम या प्रकल्पातील सर्वात कठीण टप्पा आहे. खोदकामासाठी लागणारं टनेल बोरिंग मशीन तयार असून आता येत्या काही दिवसांत खोदकामालाही सुरूवात होणार आहे. गोरेगाव येथे दादासाहेब फाळके चित्रनगरी परिसरात लाँच शाफ्टमध्ये ही मशीन सज्ज आहे. सर्व सुरक्षा तपासण्या आणि चाचण्याही पूर्ण करण्यात आल्या आहेत. काही तांत्रिक चाचण्या शिल्लक असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे अधिकृत परवानगीसाठी पत्रही पाठवण्यात आलं आहे. त्यानंतर या आठवड्याच्या शेवटी खोदकाम सुरू होईल अशी अपेक्षा आहे. बुधवारी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी प्रकल्पस्थळी भेट देऊन कामांची पाहणी केली आणि अधिकाऱ्यांना पुढील कामांचे निर्देश दिले. गोरेगाव-मुलुंड लिंक रोडसाठी दोन जुळ्या भुयारी बोगद्यांचं काम सुरू केलं आहे. गोरेगावमधील दादासाहेब फाळके चित्रनगरीपासून सुरू होऊन मुलुंडमधील खिंडीपाड्यापर्यंत हे भुयारी बोगदे असतील. प्रत्येक बोगदा ४.७ किमी लांब असेल. १४.२ मीटर व्यासाचे बोगदा असतील. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखाली हे बोगदे १३ मीटर रुंद होतील. संपूर्ण प्रकल्पासाठी १४,००० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. मुंबईत थेट पूर्व-पश्चिम लिंक तयार होणार आहे. पश्चिम उपनगरांना १२.२ किलोमीटर लांब मार्गाने थेट पूर्व द्रुतगती महामार्गाशी जोडण्यात येणार आहे. जोडरस्त्यांसह हे बोगदे ६.६५ किमी लांब होतील. जंगल, टेकड्यांच्या खालून आणि तुळशी आणि विहार तलावाच्या परिसरातून हे बोगदे बांधण्यात येणार आहेत.

# बनावट APK ॲपद्वारे 63.69 कोटींची फसवणूक

## झारखंडमधील आरोपी मुंबई पोलिसांच्या ताब्यात!

प्रतिनिधी ३० जुलै

**मुंबई:** महानगर गॅस लिमिटेडच्या नावाने बनावट संदेश पाठवणारे नागरिक त्यांच्या मोबाईलमध्ये बनावट (एपीके) फाईल इन्स्टॉल करण्यासाठी धावपळ करत आहेत. डॉ. डी. बी. यांनी हा प्रकार उघडकीस आणला आहे. झारखंडमधील एस. मंडल (२६) हा झारखंड आणि पश्चिम बंगालमध्ये शिक्षण घेतल्यानंतर अडकला आहे. या प्रकरणातील तक्रारदार महानगर गॅस लिमिटेडच्या नावाने बनावट संदेश पाठवण्यात गुंतलेला असावा. त्यानंतर मोबाईलमध्ये एपीके फाईल इन्स्टॉल करण्यासाठी सूचित केले जात असे. फाईल इन्स्टॉल करताच, मोबाईलमधून बँकिंगशी संबंधित गोपनीय माहिती चोरली जात होती आणि ७०,५०० रुपयांची फसवणूक केली जात होती. डॉ. डी. बी. यांनी मार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १००३/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१९(२) आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६(सी) आणि ६६(डी) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी आरोपीचा माग काढला आणि त्याला पकडले. आरोपीकडून दहा मोबाईल फोन, एक लॅपटॉप, सात सिम कार्ड, चार क्रेडिट/डेबिट कार्ड, ९६७ कस्टम एपीके फाईल्स आणि ३७,२०० नागरिकांच्या बँकिंग




गोपनीय माहितीचा डेटाबेस जप्त करण्यात आला आहे. तपासादरम्यान, इतर सायबर गुन्हेगारांना लक्ष्य करण्यासाठी आरोपीने तयार केलेल्या ९१ बनावट एपीके फाईल्स आढळून आल्या. या फाईल्सच्या माध्यमातून महाराष्ट्रातील ५१२ नागरिकांसह देशभरातील २,९९३ नागरिकांची सायबर फसवणुकीद्वारे एकूण ६३,६९,६८,१७४ रुपयांची फसवणूक झाली आहे. या प्रकरणाव्यतिरिक्त, आरोपीचा तपास सुरू असून पोलीस त्याच्या आर्थिक व्यवहारांचा आणि सायबर नेटवर्कचा अधिक तपास करत आहेत. पोलीस आयुक्त देवेन भारती, सहायक पोलीस आयुक्त (कायदा-सुव्यवस्था) मनोज कुमार शर्मा, अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, परिमंडळ-२ च्या पोलीस उपायुक्त आर. रागसुधा यांनी आणि सहायक पोलीस आयुक्त ज्ञानेश्वर वाघ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन दळवी, पोलीस निरीक्षक युवराज पाटील, सहायक पोलीस निरीक्षक धनवेश पाटील, अभिजीत देशमुख, पोलीस उपनिरीक्षक किरण देवरे, पोलीस हवालदार आनंद गावडे आणि पोलीस कॉन्स्टेबल दादासाहेब घोडके, अतिश वाघमारे व जगदेव यांच्या मार्गदर्शनाखाली तीच कारवाई करत पूल यशस्वीरित्या पार केला.

# " एमआयडीसी पोलिसांनी ईलेक्ट्रिक मोटार स्कुटर चोरी करणा-या दोन सराईत गुन्हेगारांना केली अटक आरोपींकडून 11 ईलेक्ट्रीक स्कुटर हस्तगत

प्रतिनिधी ३० जुलै

मुंबई : " एमआयडीसी पोलिसांनी ईलेक्ट्रिक मोटार स्कुटर चोरी करणा-या दोन सराईत गुन्हेगारांना केली अटक आरोपींकडून ११ ईलेक्ट्रीक स्कुटर हस्तगत केल्या. २०/०७/२०२६ रोजी डॉमिनोजच्या समोर, ओपस सेंटर, एमआयडीसी, अंधेरी पूर्व, मुंबई येथे पार्क केलेली फिर्यादी वैभव सुनिल गुप्ता, वय २२ वर्षे, यांची जेमोपाय कंपनीची इलेक्ट्रीक मोटार स्कुटर कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी केली म्हणुन फिर्यादी यांनी अज्ञात इसमा विरुध्द तक्रार दिल्याने एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्हयाच्या अनुषंगाने एमआयडीसी पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाने ५० ते ६० सीसीटीव्ही फुटेज तपासुन तसेच तांत्रीक तपास करुन



गुप्त बातमीदार यांच्या मार्फतीने खालील आरोपी क्र. १ यास मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले. तदनंतर आरोपी क्र. १ याच्याकडे केलेल्या चौकशीत आरोपी क्र. २ याचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास ताब्यात घेवुन नमुद गुन्हयात रितसर अटक करण्यात आली आहे.

आरोपी मोहसीन अकबरअली मालतबडे, मु. २५ वर्षे, धंदा नाही, रा.ठि. रुम नं. २०४, कश्मीरी चाल, क्रिपा मेडीकलच्या बाजुला, पंपहाऊस, जोगेश्वरी पुर्व, मुंबई. अरफात हाफीज शेख, मु. २२ वर्षे, धंदा नोकरी, रा.ठि. रुम नं. २७, बालाजी मंदीर, बाबु कसाई लेन, कपाडीया बिल्डींग, कुर्ला पश्चिम, मुंबई. आरोपीकडे केलेल्या सखोल चौकशीत त्यांनी मुंबई शहरातील मुंबई सेंट्रल, चांदीवली, चर्नीरोड, विक्रोळी, दादर, वाकोला, अंधेरी, वरळी अशा वेगवेगळया ठिकाणाहुन ईलेक्ट्रीक मोटार स्कुटर चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने सदरच्या ईलेक्ट्रीक मोटार स्कुटरबाबत अधिक तपास करुन त्या पंचनाम्याव्दारे ताब्यात घेवुन एकुण ६,१८,०००/- रुपये किंमतीच्या ११ ईलेक्ट्रीक मोटार स्कूटर जप्त करण्यात आल्या आहेत. आरोपीनी चोरी केलेल्या एकुण ११ ईलेक्ट्रीक मोटार स्कुटरचा अभिलेख तपासुन पुढील कारवाई करीत आहोत. तसेच नमुद आरोपीतांकडुन चोरी केलेल्या आणखी ईलेक्ट्रीक मोटार स्कुटरबाबत त्यांचेकडे सखोल तपास करुन त्यांनी चोरी केलेल्या ईलेक्ट्रीक मोटार स्कुटर हस्तगत करत आहोत. ही कामगिरी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई देवेन भारती, पोलीस सह आयुक्त डॉ. मनोजकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग डॉ. अभिनव , पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ ०३, मुंबई, दत्ता नलावडे व सहा. पोलीस आयुक्त अंधेरी विभाग, योगेश शिंदेयांचे मार्गदर्शनाखाली व. पो. नि घनश्याम नायर, पो. नि गुन्हे यांचे देखरेखीखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी उपनिरीक्षक किरण पर्बत, पो.शि. जाधव, पो.शी. लोखंडे, पा. शि. अवघडे, पो.शि. कदम, पो.शि. पवार, पो.ह. विशाल पिसाळ (तांत्रिक मदत) यांनी पार पाडली आहे.

# उघड्या घरातून चोरी करणाऱ्या सराईत आरोपीस अटक, मुद्देमाल हस्तगत

प्रतिनिधी ३० जुलै

**मुंबई :** निर्मलनगर पोलीस स्टेशन अंतर्गत श्रीमती गौरी राजेश खारवा जवाहर नगर गोळीबार रोड खार पूर्व यांच्या घरी 28 रोजी चोरी झाली. 29 रोजी त्यांनी फिर्याद दिली. 12 हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल चोरी झाले होते. पोलिसांनी तपास करून सुमित राकेश सांसी, वय 26 वर्ष, राठी. सांसीवाडी, जवाहर नगर गोळीबार रोड खार पूर्व याला ताब्यात घेतले. त्याच्या कडून वन प्लस कंपनीचा मोबाइल किंमत अंदाजे 7000 रुपये आणि रियल मी कंपनीचा मोबाईल किंमत अंदाजे 5,000 रुपये असा 12,000 रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. खारवा यांची मुले घरात झोपली असताना त्यांनी फोन चार्जिंगला लावले होते. परंतु ते चोरी झाल्याचे दिसून आले. गुन्ह्याच्या



अनुषंगाने संशयित इसमा बाबत गुप्त बातमीदार यांच्या कडून माहिती मिळाली की सदरचा इसम हा सांसीवाडी येथे राहणारा इसम आहे. त्याचे बाबत माहिती घेऊन त्यास सासीवाडी येथून ताब्यात घेऊन दोन पंचांसमक्ष त्याची अंग झडती घेतली. चोरीस गेलेले दोन मोबाईल त्याचे ताब्यात मिळून आले म्हणून सदर इसमास पोलीस ठाण्यात आणून गुन्ह्याच्या अनुषंगाने अधिकची चौकशी केली असता सदरचा गुन्हा त्यानेच केल्याचे कबूल केल्याने त्यास सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे तंतोतंत पालन करून नमूद गुन्ह्यात रीतसर अटक करण्यात आली आहे. तपास अधिकारी व पथकात पोलिस उपनिरीक्षक - संतोष कोळगे, हवालदार खंडारे, वाघमारे, परदेशी, भोगले, कदम, कोळी यांचा समावेश होता. ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कुलकर्णी, पोलिस निरीक्षक पारटकर (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनात पार पडली.

# उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल ! आमचा इतिहास 100 वर्षांचा, तुमचा ?

## उद्धव ठाकरेंनी काढले भाजपचे जुने दाखले!

प्रतिनिधी ३० जुलै

मंबई : शिवसेना (उद्धव बालासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकदा भाजपवर जोरदार टीका केली आहे. बुधवारी, उद्धव ठाकरे यांच्या हस्ते 'मार्मिक प्रबोधन शतक' पुस्तकचं प्रकाशन झालं. या प्रकाशन सोहळ्यात बोलताना उद्धव ठाकरे यांनी भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार टीका केली आहे. डिलीमिटेशन विधेयकावरून त्यांनी सरकारवर घणाघात केला आहे. डिलीमिटेशनचं विधेयक आणण्यासाठी खासदार फोडले जात आहे. सरकारला घटना बदलायची आहे, म्हणून पक्ष फोडले जात आहेत, असा हल्लाबोल त्यांनी यावेळी केला.

हे राजकीय पक्षांना देखील वापरतात, आणि त्यांचं काम झालं की फेकून देतात. तुम्ही रामाला देखील



वापरून फेकून दिलं आहे. ज्या रामाच्या नावावर तुम्ही सत्ता मिळवली, त्या रामाचं मंदिर लुटताना तुम्हाला लाज नाही वाटत? तरी तुम्ही हिंदू आणि आम्ही मुद्दे काढले तर म्हणतात बघा यांनी हिंदूत्व सोडलं. मग तुम्ही काय सोडलं? मुळात प्रश्न आहे तुम्ही आधी नेसलं काय होतं? आधीच तुम्ही लाज, लज्जा आणि शरम सोडली होती, मग आता फरक काय पडतोय? असा हल्लाबोल यावेळी उद्धव ठाकरे यांनी केला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, तिकडे हा प्रकार सुरू आहे, ते घराणेशाहीवर बोलतात, हो माझी घराणेशाही तर घराणेशाही पण तिची एक परंपरा आहे आणि तिचा मला अभिमान आहे. आमच्या घराण्याचा इतिहास किमान शंभर वर्ष ऑन रेकॉर्ड आहे. त्यांच्या घराण्याचं काय? कुठून आलात? नक्की कोणत्या स्टेशनवर चहा विकत होतात? याचा काही आगा पिछा नाहीये, आणि जाबादारी तर त्याहून नाहीये, मेरा क्या मै तो झोला लेके निकल जाऊंगा, मग देश का क्या होगा? म्हणून मी म्हणतो कौतुक ऐकन अन् ठाकरे कुटुंब या दोन टोकाच्या दोन गोष्टी आहेत. कारण आम्हाला ते नाही पटत, आम्ही अन्याय आणि ढोंगावर लाथ मारून पुढे जाणारे लोकं आहोत. जे सत्य आहे, त्याच्या खांद्याला खांदा लावून चालणारं आमचं कुटुंब आहे, आणि हीच आमची शिवसेना आहे, असं यावेळी उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे ह्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त डिंपल पब्लिकेशन ह्यांनी प्रकाशित केलेल्या ॲड. हर्षल प्रधान लिखीत 'मार्मिक प्रबोधनाचे शतक' व 'मर्मभेद' तसेच प्रभाकर वाईरकर संपादित ज्वलंत रेषा ह्या पुस्तकांचे प्रकाशन पक्षप्रमुख उद्धव ठाकरे ह्यांनी केले.

# धर्म पाहून कारवाई केली का? मुंबई हायकोर्टाचा पोलिसांना प्रश्न; तडीपारीचा आदेश रद्द

प्रतिनिधी ३० जुलै

मुंबई : 'त्या आंदोलनात इतर विरोधी पक्षांचे कार्यकर्तेही सहभागी झाले होते. मग, या दोघांवरच अशी तडीपारीची कारवाई का? केवळ त्यांचा धर्म पाहून पोलिसांनी अशी निवडक कारवाई केली का?', असे तिखट प्रश्न मुंबई उच्च न्यायालयाने सोशल डेमॉक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाच्या (एसडीपीआय) दोघांच्या कारवाईविषयी केले. तसेच या दोघांपैकी एकाचा तडीपारीचा आदेश न्यायालयाने पूर्णपणे बेकायदा ठरवत रद्दबातल केला. 'एसडीपीआय'चे फिरोज अब्दुल वहाब खान आणि मोहम्मद रफीक गुलाम रसूल अन्सारी या दोघांवर पोलिसांनी सन २०२४ आणि २०२५मधील वक्फ (दुरुस्ती) विधेयक, चेंबूर-गोवंडी परिसरातील निवासी भागातील सिमेंट गोदामांमुळे होणारे वायू प्रदूषण आणि बाबरी मशीद या मुद्द्यांवरील आंदोलनांवरून गुन्हे नोंदवले आहेत. त्याआधारे पोलिस उपायुक्तांनी दोघांविरोधात तडीपारीचा आदेश काढला आणि तो विभागीय आयुक्तांनी कायम केला. त्यास दोघांनी ॲड. इब्राहिम के. एम. यांच्यामार्फत फौजदारी रिट याचिकांद्वारे आव्हान दिले होते. त्यापैकी फिरोझ खानच्या बाबतीत न्या. माधव जामदार यांनी सुनावणीअंती नुकताच हा आदेश दिला. यापूर्वीही केंद्र सरकारच्या काही धोरणांविरोधात आंदोलन



करणाऱ्या 'एसडीपीआय'च्या दोन कार्यकर्त्यांविरोधातील तडीपारीची कारवाई उच्च न्यायालयाने बेकायदा ठरवून रद्द केली होती.'तिन्ही एफआयआरपैकी एकाही प्रकरणात महाराष्ट्र पोलिस कायद्याच्या कलम ५६ची अट पूर्ण होत नाही. हे कलम एखाद्या व्यक्तिकडून जीवित किंवा मालमत्तेला धोका निर्माण करणारा गुन्हा होण्याची शक्यता असल्यास तडीपारीची कारवाई करण्यास परवानगी देते. या प्रकरणात तशी काही शक्यताच नव्हती', असा युक्तिवाद इब्राहिम यांनी केला. तर, मुख्य सरकारी वकील शिशिर हिरे यांनी पोलिसांच्या कारवाईचे समर्थन करताना याचिकाकर्त्यांचे संबंध 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' (पीएफआय) या बंदी घातलेल्या संघटनेशी असल्याचा दावा केला. मात्र, याचिकाकर्त्यांनी हा आरोप फेटाळून लावला.

'तपास सुरू असलेल्या गुन्ह्यांच्या आधारे तडीपारीची कारवाई करता येत नाही, हे कायद्याचे तत्त्व प्रस्थापित झालेले आहे. या प्रकरणातील 'एफआयआर'मधून केवळ सरकारी निर्णयांना विरोध झाल्याचे दिसते. त्यातील एका आंदोलनात तर राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना उबाठा पक्षासह अनेक विरोधी पक्ष सहभागी होते. मग केवळ या पक्षाच्या कार्यकर्त्यांविरोधात तडीपारीची कारवाई कशी ? हे दोघे एका विशिष्ट धर्माचे असल्यानेच निवडून कारवाई केली का?', असे प्रश्न न्यायमूर्तींनी उपस्थित

**'बाबरी 'विषयीचे मत देशविरोधी कसे ?**

बाबरी मशिदीच्या मुद्द्यावरील आंदोलनाच्या 'एफआयआर' चाही आधार पोलिसांनी तडीपारीच्या कारवाईच्या समर्थनार्थ घेतला. मात्र, 'बाबरी मशीद पाडली जाऊ नये, असे याचिकाकर्त्यांचे मत असू शकते. प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आहे. मग, असे मत व्यक्त करणे देशविरोधी कसे ठरू शकते?', असा प्रश्नही न्यायमूर्तींनी उपस्थित केला.

# एनसीएमसी स्मार्ट कार्डची मुदत वाढली

प्रतिनिधी ३० जुलै

**मुंबई :** एसटी प्रवासात शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी 'एनसीएमसी स्मार्ट कार्ड' अनिवार्य करण्याच्या निर्णयाला आता १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना अद्याप एनसीएमसी स्मार्ट कार्ड प्राप्त झाले नसल्याने त्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

## आता 1 सप्टेंबरपर्यंत करता येणार अर्ज

राज्य शासनाच्या वतीने अमृत ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, ज्येष्ठ नागरिकांना तसेच महिलांना प्रवास भाड्यात ५०% सवलत देण्यात येते. या सवलती अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी १ ऑगस्टपासून 'एनसीएमसी स्मार्ट कार्ड' अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, राज्यातील अनेक पात्र प्रवाशांनी एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली असली तरी काही ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना अद्याप प्रत्यक्ष कार्ड मिळालेले नाही. त्यामुळे केवळ कार्ड उपलब्ध न झाल्याने पात्र प्रवाशांना शासनाच्या सवलतीपासून वंचित राहावे लागू नये, याची दखल परिवहन मंत्री सरनाईक यांनी घेतली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ♦ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ♦ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A 3072, RRC Helpline No. 8484842135